cmyk

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि.८ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# संतोष देशमुख नंतर माझा नंबर आकाने लावला

## २५ कोटींची ऑफर मी नाकारली, धनंजय मुंडेंच्या आरोपांना गंगाधर काळकुटेंचे प्रतिउत्तर





Email.- dailydivyawarta@Gmail.com

Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

बीड , (दिव्य न्युज):- मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केलेला आहे. धनंजय मुंडे यांनी माझी अडीच कोटींना सुपारी दिल्याचा खळबळजनक दावा जरांगे यांनी केलाय. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेत त्यांना प्रत्युत्तर दिलं. 'आता ज्या कोणाला अटक झाली असेल ते गेस्ट हाऊसवर येऊन भेटले असतील. अटक झालेले कार्यकर्ते त्यांचेच, कबुली देणारे कार्यकर्ते त्यांचेच आणि आरोप माझ्यावर करतायत', असं मुंडे यांनी उत्तर दिलं.

त्याचदरम्यान, मनोज जरांगेंचे निकटवर्तीय गंगाधर काळकुटे यांच्यावर देखील मुंडेंनी आरोप केले होते. आता त्या आरोपांवर गंगाधर काळकुटे यांनी ▶▶ पान २ वर

# अविनाश धांडेंच्या आत्महत्येने बीड नगर परिषदेत खळबळ

### अनेक अधिकाऱ्यांच्या नावाची नोट मोबाईलमध्ये, अंधारे, काळे, तिडके, वाघमारे येणार अडचणीत

बीड, (दिव्य न्युज):- नगरपरिषद कर्मचारी आत्महत्या प्रकरणी अनेकांची नावे जोडले जात असून, मयताने आत्महत्या पूर्वी डीपीओ संभाजी वाघमारे, पूर्वीच्या सीओ निता अंधारे, सम्राट कदम, विशांभर तिडके यांच्यावर आरोप कले आहे. हा मजकूर मयत धांडे यांच्या मोबाईल मध्ये नोट पॅड मध्ये आहे. यामुळे मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांच्या तपासातच याबाबत खुलासा होईल.

अविनाश धांडे असे आत्महत्या केलेल्या कर्मचाऱ्याचे नाव असून, ते नगरपरिषदेत वसुली विभागात कार्यरत होते. शुक्रवारी (दि.७) रात्री १२ वाजण्याच्या सुमारास नगरपरिषद इमारतीच्या छतावर लोखंडी शिडीला गळफास घेतलेल्या अवस्थेत अविनाश धांडे यांचा मृतदेह आढळून आला. यामुळे

शहरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करुन मृतदेह जिल्हा रुग्णालयात हलविला होता. सकाळी याप्रकरणी मयताचा मोबाईल तपासला असता त्यात नोट पॅड मध्ये पान २ वर

# निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरा, नाहीतर बॅलेट पेपरवर घ्या

### हायकोर्टाची निवडणूक आयोगाला नोटीस

नागपूर, (दिव्य न्युज):- राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुंषगाने उच्च न्यायालयाने विविध मागण्यांसाठी याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. गेल्याच आठवड्यात न्यायालायने मतदार यादींसंदर्भाने दाखल ४ याचिका फेटाळून लावल्या आहेत. मात्र, आता व्हीव्हीपॅट मिशन संदर्भाने केलेल्या याचिकेवर निवडणूक आयोगाला नोटीस बजावत १८ नोव्हेंबरपर्यंत उत्तर देण्याचं बजावलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ईव्हीएमसोबत व्हीव्हीपॅट बसवा, अन्यथा मत पत्रिकांद्वारे निवडणुका घ्या, अशी मागणी काँग्रेस नेते प्रफुल्ल गुडधे यांनी याचिकेद्वारे नागपूर खंडपीठात केली आहे. याप्रकरणी, न्यायालयाने निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत व्होटर व्हेरिफाइड पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) यंत्रणेचा वापर न करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडधे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर ▶▶ पान २ वर

# तेव्हा पार्थ पवारांवर गुन्हा दाखल करू

### शरद पवारांच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्याचें उत्तर

मुंबई , (दिव्य न्युज):- पुण्यातील मुंढवा परिसरातील अमेडिया कंपनीने खरेदी केलेल्या ४० एकर जमिनीच्या व्यवहारावरून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्यावर गंभीर आरोप झाले आहेत. अमेडिया कंपनीत पार्थ पवार यांची ९९ टक्के मालकी, तर दिग्विजय पाटील यांची केवळ १ टक्के मालकी असल्याचे समोर आले आहे. याच प्रकरणात दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र पार्थ पवार यांच्यावर कारवाई का झाली नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना विचारले असता 'महाराष्ट्राचे गृहमंत्री याचं उत्तर देऊ शकतील, मी देऊ शकत नाही', असे त्यांनी म्हटले. आता शरद पवारांच्या प्रश्नावर ▶▶ पान २ वर

## इरादो मे दम हैं तो मंजिले भी झुका करती हैं

# अबकी बार प्रभाग के मतदारो की पुकार-अशफाक इनामदार





### अभी तो हम मैदान मे उतरे भी नही और लोगोने हमारी चर्चा शुरु कर दी...!

### विरोधी उमेदवाराची अवस्था म्हणजे इथर का ना उधर का अशीच झाली

### प्रभागातील गोर गरीबांसाठी २४ तास आणि ३६५ दिवस

# अशफाक इनामदार यांचे दरवाजे कायम उघडे

### प्रभागातील जनतेसाठी सतत उपलब्ध असणे त्यांचे प्रश्न मार्गी लावणे यामुळे प्रभागात तुफान क्रेझ

# गेमचेंजर

वीस वर्षाच्या सामाजिक उपक्रमामुळे प्रभागातील तमाम मतदारांचा आशिर्वाद माझ्या पाठीशी

प्रभाग क्रं.18

बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर पालिकेच्या निवडणूकीचे वारे आता जोरदार वाहू लागले आहे. प्रत्येक पक्षाकडून आता इच्छूक उमेदवारांची मुलाखत घेणे अंतिम टप्प्यात आले असून प्रत्येक पक्षाच्या कार्यालयासमोर इच्छूकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. बीडमध्ये सर्वात जास्त चर्चा आहे तो राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची... पूर्ण ताकदीने हा पक्ष निवडणूकीच्या मैदानात उतरला असून नगराध्यक्षांसह सर्वच प्रभागात पक्षाकडून उमेदवार अंतिम झाले आहेत. लवकरच उमेदवारांची यादी जाहिर केली जाणार असून प्रत्येक प्रभागात तगडे उमेदवार या पक्षानी मैदानात उतरविण्याचे ठरविले आहे. असाच एक प्रभाग बीड शहरात असून प्रभाग क्रं. १८ हा चर्चेचा आणि महत्वाचा प्रभाग आहे. या प्रभागातून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून बीड नगर पालिकेचे माजी सभापती अशफाक इनामदार यांना उमेदवारी दिली आहे. मागील निवडणूकीत अवघ्या काही मतांनी त्यांचा पराभव झाला होता पण ते मनावर न घेता त्यांनी मोठ्या जिद्दीने याचा सामना करत नगरसेवक नसतांनाही नगरसेवक पदाला लाजवेल असे दर्जेदार आणि विकासाभिमुख कामे प्रभागात केली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ.धनंजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस नेते माजी आ.अमरसिंह पंडित, बीड नगर पालिकेचे जेष्ठ नेते मोईन मास्टर, माजी उपगनराध्यक्ष फारूक पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली अशफाक इनामदार यांनी या प्रभागात तब्बल ३० पेक्षा जास्त सिमेंट रस्ते केले ,प्रभागात नवीन पाईपलाईनसह विद्यूत कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आले. प्रभागातील गोर गरीबांना संजय गांधी, श्रावण बाळ योजनेतून ३५० लाभार्थ्यांना लाभ मिळवून दिला. लाडकी बहिण योजने अंतर्गत प्रभागातील लाड्या ३५० बहिणींना विना मुल्य लाभ मिळवून दिला. प्रभागात अनगिनत राशन कार्डचे वाटप केले. रात्रं असो कि दिवस प्रभागातील मतदारांच्या एका

सविस्तर पान २ वर





### अशफाक इनामदार यांच्या व्यक्तीमत्वातील सगळ्यात महत्वाचा पैलू म्हणजे प्रभागातील प्रत्येक कामांचे ज्ञान यामुळेच या निवडणूकीत ठरणार गेमचेंजर

cmyk

# अ‍ॅट्रॉसिटीचा कालचा फिर्यादी आज विनयभंग प्रकरणी 'पॉस्को'त आरोपी!

केज , (दिव्य न्युज):- पोलीस भरतीचे स्वप्न पाहणाऱ्या एका महाविद्यालयीन तरुणीला तिच्याच गावातील आणि महाविद्यालयातील अल्पवयीन तरुणाकडून मनस्ताप आणि अत्याचाराचा सामना करावा लागल्याची धक्कादायक घटना केज तालुक्यात उघडकीस आली आहे. मैदानावर सराव करत असताना या १७ वर्षीय तरुणाने तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यासह विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवारी (दि. ३) सकाळी ही अल्पवयीन पीडित तरुणी आपल्या मैत्रिणींसोबत शेजारच्या गावातील मैदानावर पोलीस भरतीच्या तयारीचा सराव करत होती. त्याचवेळी तिच्या गावातील आणि त्याच महाविद्यालयात शिक्षण घेणारा १७ वर्षीय तरुण दुचाकीवरून तेथे आला. तरुणाने थेट तरुणीच्या हाताला धरून ओढले आणि 'तू मला दहावीपासून आवडतेस, आय लाईक यू, तू माझ्यासोबत लग्न कर' असे बोलून तिचा विनयभंग केला.

मुलीने त्याला 'तू मला आवडत नाहीस' असे सांगितल्यावर संतापलेल्या तरुणाने तू जर मला नकार दिलास, तर मी तुझ्याबद्दल गावात अपप्रचार करून, तुझे करिअर खराब करीन, अशी धमकी दिली आणि तेथून पसार झाला. यापूर्वीही तो तिचा अनेक वेळा पाठलाग करत होता. घडलेला प्रकार मुलीने आई-वडिलांना सांगितल्यानंतर त्यांनी केज पोलीस ठाण्यात धाव घेतली. पिडीत अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून अल्पवयीन तरुणाविरुद्ध बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यासह विनयभंगाचा गुन्हा (भा.दं.वि.) नोंदवण्यात आला आहे.

# कुंबेफळ शिवारात शेतवादातून शेतकऱ्याला मारहाण

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- ग्रामीण परिसरातील कुंबेफळ शिवारात जुन्या शेतवादातून शेतकऱ्याला लाकडी दांड्याने आणि वायरने मारहाण करण्या आली. ही घटना ३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडली.

दिगांबर निवृत्ती थोरात (वय ३६, व्यवसाय शेती, रा. कुंबेफळ ता. अंबाजोगाई जि. बीड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादी आपल्या शेतातील काम आटोपून घरी परत येत असताना हनुमंत श्रीधर कदम, श्रीकांत हनुमंत कदम, कृष्णा हनुमंत कदम, वसंत दशरथ भोसले आणि कृष्णा तुकाराम माने (सर्व रा. कुंबेफळ) यांनी त्याच्यावर जुन्या शेतवादातून लाकडी दांडा व वायरने हल्ला करून मारहाण केली. फिर्यादीची पत्नी बचावासाठी गेली असता तिलाही शिवीगाळ व मारहाण करण्यात आली.

या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला गेला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस अधिकारी उळे करीत आहेत. फिर्यादी आज पोलिस ठाण्यात हजर झाल्याने गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## इरादो मे दम है तो मंजिले भी झुका करती है

# अबकी बार प्रभाग के मतदारो की पुकार-अशफाक इनामदार










फोनवर अशफाक इनामदार हाजीर असतात. मग ते शासकीय रूग्णालय असो की शासकीय कार्यालय असो, किंवा पोलीस स्टेशन असो आश्फाक इनामदार सर्वांच्या अगोदर त्या ठिकाणी हाजीर असतात. अशफाक इनामदार यांच्या चर्चेने विरोधी उमेदवाराचे तर ढिकऱ्या उडाल्या. उमेदवाराची अवस्था ना इधर का ना उधर का अशीच झाली आहे. आश्फाक इनामदार यांनी प्रभाग क्र १८ झमझम फॅक्ट्री समोर तसेच कुरआन सेंटर समोर हयात रूग्णालयासमोर, हाजी मुख्तार गुत्तेदार यांच्या घरासमोर, खानखा मस्जिद परिसर तसेच नदीम सर व खमरूल इमान यांच्या घरासमोर, अलिम पटेल, लाल मामू यांच्या घरासमोर, शाफे मेडिकल-मझहर खान यांच्या घरासमोर, इफ्तेखार शेठ-नासेर सर यांच्या घरासमोर, डोंगरे ताई ते सय्यद नदीम यांच्या घरासमोर, मौलाना वाहेद -फेरोज किराणा यांच्या घरासमोर, अजिम भाई रशिद भाई यांच्या घरासमोर, खासबाग मस्जिद-सत्तार भाई -कमाल भाई सरकारी दवाखाना ते रहिम इनामदार यांच्या घरासमोर, जाकेर भाई ते बाबा टेलर यांच्या घरासमोर, इसाक भाई -ईर्शाद भाई लतिफ यांच्या घरासमोर, मतीन भाई नगरसेवक ते आमेर रेतीवाले यांच्या घरासमोर, देवी मंदिर ते सिराज भाई यांच्या घरापर्यंत, अबु दुर्रा मस्जिद समोरील खासबाग देवी ते हत्तीखाना, काली मस्जिद ते कागदी दरवाजा चौकापर्यंत, अक्सा मस्जिद समोर मुन्ना इनामदार ते आमेर सलीम, वहिद देशमुख यांच्या घरासमोर, जावेद इनामदार सर ते डॉ.हसीब यांच्या घरासमोर, शकील खान यांच्या घरासमोर, गुलजार पुरा येथे अत्यंत टिकावू आणि दर्जेदार उच्च दर्जाचे सिमेंट रस्ते तयार करण्यात आले. या परिसरात प्रभागातील नगरसेवकांनी कोणतीच कामे केली नाहीत. अशफाक इनामदार यांनी या प्रभागातील रस्त्याचा प्रश्न मार्गी लावला. या रस्त्याच्या कामावर करोडो रूपयांचा निधी खर्च करण्यात आला. आडत मार्केट ते पुलापर्यंत पाईपलाईन टाकण्यात आली अशी एक ना अनेक कामे त्यांनी मार्गी लावले. भगवान बाबा ते स्मशानभुमीपर्यंत सिमेंट रस्ता झाला पण या उलट या प्रभागातील नगरसेवकांनी मी मंजूर करून आणलेले अक्सा मस्जिद समोरील रस्त्याच्या कामाचे पैसे काम न करताच उचलून खालले अशी एक ना अनेक कामे या प्रभागात पूर्ण केले. आता पुढील पाच वर्षात नगरसेवक झाल्यानंतर या परिसरात एक ही काम शिल्लक ठेवले जाणार नाही. प्रभागातील मतदारांनी या निवडणूकीत आशिर्वाद रूपी मतदान करून मला दुवाँ द्यावी मी तुमच्या सेवेसाठी २४ तास हाजीर राहिल याची ग्वाही देतो.... **म्हणूनच म्हणतात ना मंजिले उन्ही को मिलती है जिन्के सपनो मे जान होती है... पंखोसे कुछ नही होता हौसलो से उडान होती है....**

पान ४ वरून

## कार्यकाळात उल्लेखनीय

मला पुन्हा निवडून देऊन आपला आशीर्वाद द्यावा, अशी भावनिक विनंती त्यांनी नागरिकांकडे केली.भरगच्च उपस्थिती असलेल्या या संवाद बैठकीत भारत महाराज, मिश्रा सर, सिकंदर भाई, बाबा भाई टेलर, प्राध्यापक चव्हान सर, प्राध्यापक बोबडे सर, अँड. युसुफ सर, शहेबाज बेग, अस्लम भाई, अफसर चाचा, मोईन भाई, सुलतान भाई, मतीन भाई, मोबीन भाई यांसह धर्मगुरू, गुत्तेदार, व्यापारी, लेबर वर्ग, जेष्ठ नागरिक आणि सुशिक्षित तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या अखेरीस उपस्थित नागरिकांनी अन्वर मिस्किन यांना पुन्हा एकदा विजयी करण्याचा निर्धार व्यक्त करत त्यांच्यावर विश्वासाचा शिक्का मोर्तब केला.

## ३० वर्ष बीडच्या

कुटुंबाच्या तिसऱ्या पिढीत डॉ. योगेश क्षीरसागर आणि विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर सक्रिय आहेत. त्यांनी सलग दुसऱ्यांदा आमदारकी मिळवली. इतकी प्रभावी राजकीय पकड असूनही मूलभूत समस्या 'जैसे थे' आहेत. आता आगामी निवडणुकांमध्ये हे कुटुंब शहरातील रखडलेल्या विकासकामांवर आणि अपूर्ण पाणी योजनेवर कोणते उत्तर देते, यावर त्यांचे राजकीय भविष्य अवलंबून असणार आहे.

## स्पर्धेच्या युगात

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष आनंद जाधव, माजी जिल्हा परिषद सभापती महेंद्र गरजे, सोमीनाथ कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी बोलताना सागर धस म्हणाले, आजच्या काळात यशस्वी होण्यासाठी धाडस, दृष्टीकोन आणि मेहनत या तिन्ही गोष्टींचा संगम आवश्यक आहे. कोणताही व्यवसाय प्रामाणिकपणे, इमानदारीने आणि सचोटीने केल्यास नक्कीच यश मिळते. तरुण पिढीने केवळ सरकारी किंवा खाजगी नोकरीकडे न पाहता स्वतःचे काहीतरी निर्माण करण्याची जिद्द बाळगली पाहिजे. आर्थिक समतोल राखायचा असेल तर उत्पन्नाचे विविध स्त्रोत असणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशील ढोले यांनी केले, मान्यवरांचे स्वागत अनिल ढोले यांनी केले, तर आभार प्रदर्शन अक्षय जाधव यांनी केले. या प्रसंगी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जरांगे पाटलांना

जबाबदार प्रशासन व पाटलांना जिवे मारण्याचा कट रचनारी टोळी जबाबदार राहील असा इशारा सरकारला निवेदनाद्वारे देत आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.मराठा संघर्ष योध्दा श्री. मनोजदादा जरांगे पाटील यांची २.५ कोटी रू.ची सुपारी देवुन हत्या घडवण्याचा प्रयत्न झाल्याबाबत जालना पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल झाली असून संशयीत दोन व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत असून या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून दोषी विरूध्द कायदेशिर कार्यवाही करावी व मराठा संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याने त्यांना न + सुरक्षा पदान करावी, ही विनंती ही मागणी मान्य नाही केली तर व यांच्या जिविताला काही झाले तर अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्रराज्य संघाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रदेशाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दिला आहे व त्यांला जबाबदार प्रशासन व पाटलांना जिवे मारण्याचा कट रचनारी टोळी जबाबदार राहील असा इशारा सरकारला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

पान १ वरून

## संतोष देशमुख नंतर

देखील उत्तर दिलं आहे.

धनंजय मुंडेंनी माझ्यावर संभ्रम निर्माण करणारे वक्तव्य केले आहेत. माझ्यामध्ये आणि मराठा समाजामध्ये, माझ्यामध्ये आणि जरांगे पाटलांमध्ये दरी निर्माण व्हावी म्हणून हे वक्तव्य त्यांनी केलं आहे. संतोष आण्णांचा खून झाला तेव्हाच तुमची आणि माझी मैत्री संपली. संतोष भैय्यानंतर माझा नंबर आकाने लावला होता. त्याचे रेकॉर्डिंग आणि पुरावे माझ्याकडे आहेत. लोकसभा निवडणुकीत मी फॉर्म भरला, पण मनोज दादांनी सांगितलं म्हणून मी माघार घेतली. मला विधानपरिषदेचं तुम्ही आमिष दाखवलं होतंस. त्याला मी लाथ मारली', असं काळकुटे यांनी म्हटलं आहे.

लोकसभेवेळी तुम्ही माझ्या भावाकडे काय निरोप दिला होता, त्याची रेकॉर्डिंग मी ऐकवणार आहे. २५ कोटींची ऑफर मी नाकारली. तुमचे माणसं इथे काय काय घेऊन आले नंतर आम्ही त्याला परत पाठवलं. तुमचा राग आहे म्हणूनच मला डुकरासारखं ओढून नेतो असं म्हणाले होते. मराठा-ओबीसी आरक्षण प्रकरण टोकाला होतं म्हणून, आम्ही माघार घेतली. ओबीसी सभेत सुतळी बॉम्ब टाकून मला अडकवायचं तुम्ही ठरवलं होतं. मी ४०-५० कोटींचे काम आणले. पण टक्केवारी देऊन पण तुमच्या आकाने ते काम अडवलं', असा आरोपी काळकुटे यांनी यावेळी केला.

## अविनाश धांडेंच्या

धक्कादायक मजकूर आढळला आहे. यात त्यांनी डीपीओ संभाजी वाघमारे यांनी अनुभव नसणाऱ्या प्रमोशन दिले असून, जे प्रमोशनच्या लायक आहेत त्यांना डावलण्यात आले. तत्कालीन सीओ निता अंधारे यांनी सीआर वर मार्क कमी दिले आहे.तसेच वसुली विभागातील सम्राट कदम व विशांभर तिडके यांनी दाम करी काम इतकेच काम केले. चंद्रकांत काळे यांनी माझा पुरेपूर फायदा घेतला असा मजकूर आहे. यामुळे एकच खळबळ उडाली असून, ही नावे समोर आल्याने यांचा त्रास होता का? की, प्रमोशनाच्या लायक असताना ही डावलल्याने हा पाऊल उचलले की, काय? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे. या प्रकरणाचा पोलीस आता तपास करतील त्यातून हे नेमकं प्रकार काय हे निष्पन्न होईल. तसेच त्यांनी या नोट पॅडवर मित्रांची माफी मागितली असून, इतर वैयक्तिक व्यवहार बाबतीत उल्लेख आहे. तसेच सध्याचे सीओ फडसे यांना उद्देशून लिहिताना साहेब माझा कुटुंबाला परेशानी होऊ देऊ नका. वेळेवर त्यांना माझा पीएफ व इतर वेळेत द्यावे असे आवाहन करीत तुम्ही अभ्यासु आहात माझा तुमच्यावर विशास आहे असा मजकूर आहे. यामुळे याची पूर्ण चौकशी करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## निवडणुकीत व्हीव्हीपॅट

खंडपीठात आव्हान दिले असून न्यायायालयाने राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावत १८ नोव्हेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहे. याचिकेमध्ये मागणी करण्यात आली आहे की, आयोगाने प्रत्येक ईव्हीएम यंत्रासोबत व्हीव्हीपॅट यंत्रणा सक्तीची करावी किंवा मत पत्रिकांद्वारे निवडणुका घेण्याचे आदेश द्यावे, अशी विनंती करण्यात आली होती. व्हीव्हीपॅट यंत्रणेमुळे मतदारांना त्यांचे मत योग्य उमेदवाराला गेल्याची खात्री पटते. त्यामुळे, ईव्हीएमसोबत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात यावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. त्यावर, न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या खंडपीठापुढे सुनावणी करताना नागपूर खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावत १८ नोव्हेंबरपर्यंत उत्तर देण्यास सांगितले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ईव्हीएम सोबत व्हीव्हीपॅट बसवा, अन्यथा मत पत्रिकांद्वारे निवडणुका घ्या, अशी मागणी करणाऱ्या काँग्रेस नेते प्रफुल्ल गुडधे यांनी केली आहे. राज्यात २४६ नगरपालिका १८ नगरपंचायत निवडणुकांची घोषणा करण्यात आली असून २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे, तर ३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. त्यासाठी, दोन दिवसांत म्हणजे १० नोव्हेंबरपासून उमेदवारांचा अर्ज भरण्यासही सुरुवात होईल. त्यामुळे, निवडणूक आयोग न्यायालयात काय भूमिका मांडणार, मतदान प्रक्रियेत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यास तयार होणार का, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल.

## तेव्हा पार्थ पवारांवर

मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी त्याचे कारण स्पष्टपणे सांगितलेले आहे. हा एफआयआर आहे. एफआयआर म्हणजे फर्स्ट इन्फॉर्मेशन रिपोर्ट. त्यात ज्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यांच्यावर तरच गुन्हा दाखल होतो. त्यामुळे कंपनीचे ऑथराईज सिग्नेटरी जे होते, ज्यांनी हा सगळा व्यवहार केला, त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. त्यासोबत सरकारमधील ज्यांनी या संदर्भात मदत केली त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. आमचा कुणालाही वाचवण्याचा प्रयत्न नाही. कोणाला वाचवण्याचे कारण नाही. जे झाले ते नियमानुसार झालेले आहे. मी यापूर्वी देखील सांगितले की, या गुन्ह्याचा तपास सुरू असताना कोणाचा सहभाग आढळला तर आपल्याला कारवाई करावीच लागते. नियमानुसार ही कारवाई करण्यात आलेली आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

शरद पवार यांनी अकोल्यातील पत्रकार परिषदेत म्हटले की, पार्थ पवार जमीन प्रकरण गंभीर आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. मुख्यमंत्री एखादा विषय गंभीर आहे असे म्हणत असतील, तर त्यासंबंधी चौकशी करुन वास्तव हे त्यांनी समाजासमोर ठेवले पाहिजे. ते काम त्यांनी करावे अशी अपेक्षा आहे. मुंढव्यातील हा जमीन व्यवहार दुय्यम निबंधकांनी रद्द केला आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला. त्यांच्याकडे मजबूत पुरावे गोष्टी असतील, त्याआधारे निर्णय घेतला असेल, असे त्यांनी म्हटले. शरद पवार यांना शीतल तेजवानी आणि अन्य आरोपींबद्दलही विचारणा करण्यात आली. त्यावर पवार यांनी म्हटले की, कोण तेजवानी, आणखी कोण, यांची नावं मला माहिती नाही. ज्यांनी याबाबत आरोप केले, त्यांनीच हे सगळं शोधून काढावे, असे त्यांनी म्हटले. तर पार्थ पवार यांच्यावर कारवाई का झाली नाही? असे विचारले असता महाराष्ट्राचे गृहमंत्री याचं उत्तर देऊ शकतील, मी देऊ शकत नाही' असे शरद पवारांनी म्हटले.